Special Issue August 2019

विद्यावार्ता

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

आणि

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विषयांतर्गत राष्ट्रीय चर्चासत्र

# वैचारिक मराठी साहित्य :

## शोध, स्वरुप व अभिव्यक्ती

संपादक
डॉ.देविदास खोडेवाड



Scanned with OKEN Scanner

52) महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार
प्रा.डॉ. विजय गणपतराव वारकड, नांदेड ||174

53) वैचारिक आदिवासी मराठी साहित्य : शोध व स्वरूप
डॉ. देविदास खोडेवाड, अंबाजोगाई ||177

54) सांस्कृतिक पर्यावरण आणि मध्ययुगीन स्त्रीवादाचे चित्रण
प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे, औरंगाबाद. ||180

55) स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या कवितेतील वैचारिकता
वीणा कुलकर्णी, अंबाजोगाई ||188

56) लोकनाथ यशवंत यांच्या कवितेचा वैचारिक परिप्रेक्ष्य
रामप्रसाद उद्धव वाव्हळ , औरंगाबाद. ||189

57) विचारशलाका नियतकालिकातील वैचारिक चिंतन
प्रा.डॉ. मुळे कांचन खुशालराव, उदगीर ||192

58) मराठी कवितेतील कृषीजीवनाचा आविष्कार
डॉ. दीपक सुभाषराव सुर्यवंशी, उस्मानाबाद ||197

59) Thoughts on education
Ms. Pratima Kamlakar Kamble, Nanded ||201

60) परिवर्तनवादी वैचारीक साहित्य चळवळ : महानुभाव संप्रादाय
प्रा. रामेश्वर चाटे, परळी वैद्यनाथ जि. बीड ||204

61) वैचारिक वाङ्मयातील 'नवभारत' नियतकालिकाचे योगदान
डॉ. महेश नारायण गायकवाड, सातारा ||206

62) समकालीन आदिवासी साहित्य आणि समाजवास्तव
डॉ. वैजनाथ अनमुलवाड, नांदेड ||210

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



131

Scanned with OKEN Scanner

58

# मराठी कवितेतील कृषीजीवनाचा आविष्कार

डॉ. दीपक सुभाषराव सुर्यवंशी
मराठी विभाग,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब
जि. उस्मानाबाद

**प्रास्ताविक :**

भारतीय समाजाची रचना ही वैविध्यपूर्ण असल्याची दिसते. बहुतांश समाज हा ग्रामीण भागात वास्तव्य करणारा आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधींनी खरा भारत हा खेड्यात वसलेला आहे हे लक्षात घेऊन खेड्याकडे चला अशी हाक दिली. महात्मा फुले, छत्रपती शाहु महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक जडणघडणीतून ग्रामीण समाजजीवनाची उभारणी झालेली आहे. ग्रामीण लोकजीवन, शेती, शेतीपूरक उद्योगधंदे, रीतीरिवाज, पारंपारिक जीवन जगण्याच्या पद्धती, परंपरा, श्रद्धा व अंधश्रद्धा, लोकांचे स्वभावविशेष, अस्मानी व सरकारी अशा समस्यांत जीवन जगणार शेतकरी वर्ग, शेतमजूर तसेच बाजारपेठेतून होणारे आर्थिक-शोषण अशा अनेक विषयांवर चिंतन व्यक्त करणारी मराठी कविता ही अत्यंत संवेदनशील असलेली कविता लोकप्रिय ठरली आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून प्रातिनिधीक कवींच्या कवितांचे चिंतन केले आहे.

आधुनिक कालखंडात महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, हरिभाऊ आपटे, रा. वि. टिकेकर यांच्या साहित्यातून प्रथमतः शेती व शेतकरी जीवनाविषयीचे चित्रण करण्यात आले. साहित्य व समाजाचा अन्योन्न संबंध असल्याने जीवनातील पैलूंचा आढावा त्यातून घेतलेला असतो. या पिढीच्या लेखनविषयक जीवन जाणीवांचे संदर्भ नोंदविताना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ग्रामीण साहित्यिकांना ग्रामीणांच्या जीवनाचे विश्लेषण करण्यासाठी आजही महात्मा फुले ऊर्जास्त्रोत ठरतील. ग्रामीण लोकजीवनाचा वेध खऱ्या अर्थाने ज्या साहित्यिकांनी घेतला त्यामध्ये रा. रं. बोराडे, आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, सदानंद देशमुख, भारत काळे, बाबाराव मुसळे, मधू सावंत, शंकर सखाराम, राजन गवस, विठ्ठल वाघ, रंगनाथ पठारे, बाबा भांड, भास्कर चंदनशिव, गणेश आवटे, केशव देशमुख, आप्पासाहेब खोत, इंद्रजित भालेराव, मोहन पाटील, द. ता. भोसले, फ. मु. शिंदे, फ. म. शहाजिंदे, ना. धों. महानोर, हमीद दलवाई, उत्तम कांबळे, चंद्रकांत नलगे, राजन गवस, आसरडोहकर, रवींद्र शोभणे, आसाराम लोमटे, नारायण कुलकर्णी, उत्तम कोळगावकर, नारायण सुमंत, गणेश देशमुख, श्रीकांत देशमुख, प्रदीप पाटील, एकनाथ पाटील, अजय कांडर, लक्ष्मण महाडिक, दयासागर बन्ने, गोविंद पाटील, पोपट सातपुते, प्रकाश घोडके, चंद्रशेखर मलकंमपट्टे, जयराम खेडेकर, जगदीश कदम, प्रकाश किनगावकर, रमेश चिल्ले, मारोती कसाव, प्रशांत मोरे, संतोष पवार, किशोर सानप, रमेश इंगळे, सुरेश पाटील, शंकर वाडेवाले, ललित अधाने, आशा वगे अशा अनेक दमदार साहित्यिकांनी चिंतन केले आहे.

**संशोधनपद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक चिकित्सना अभ्यासपद्धतीचा अवलंब केला आहे.

**शोधनिबंधाचे स्वरूप :**

कथा, कविता, कादंबरी, इ. महत्त्वाच्या साहित्य प्रकारांमधून मानवी समाजजीवनाच्या जाणिवा अधिक प्रकर्षाने दिसून येतात. ग्रामीण माणूस विशेषतः शेतकरी हा साहित्याचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. कविता हा साहित्यप्रकार सर्वाधिक जवळचा संवेदनशील असून भावनांचा अविष्कार त्या माध्यमातून अभिव्यक्त होतात. देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे ऊलटले मात्र ग्रामीण भागातील लोकांच्या, शेतकऱ्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न आजही तसेच आहेत. सातत्याने असमानी संकट, महापूर, गारपीठ तसेच सुलतानी संकटांमध्ये शेतीला अनुकुल असणारी व्यवस्था तयार होताना दिसत नाही. परिणामी मोठ्याप्रमाणावर शेतकरी, शेतमजूर आत्महत्या करीत आहेत. राजकारणी लोक मात्र झपाट्याने श्रीमंत होत आहेत. खेडी उद्ध्वस्त होत आहेत शहरे महाकाय होताना दिसत आहेत.

आजचे जग हे खाऊजा व विज्ञान तंत्रज्ञानाचे असल्याने दिसते. सर्वत्र जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे. परिणामी माणूस हा परिस्थिती समोर हतबल होत असून माँणूसकीचा ऱ्हास होताना दिसत आहे, माणसे संवेदनाशून्य होत आहेत. थोर समाज सुधारक महात्मा ज्योतीराव फुले यांनी जे स्वप्न पाहिले होते. ते म्हणजे शेतकऱ्यांचा मुलगा शिकेल तो अधिकाऱ्याच्या पदावर जाईल तेव्हाच खऱ्या अर्थाने गरीब शेतकरी शेतमजूर यांचे जीवनात परिवर्तन होईल व त्यांचे शोषण थांबेल. परंतू आज शेतकऱ्यांचा मुलगा अधिकारी पदावर गेला मात्र अजूनही त्यांच्या भोवताली असणाऱ्या लोकांच्या जीवनात कोणताच बदल घडून आला नाही. यावरून



Scanned with OKEN Scanner

असे लक्षात येते की, भ्रष्ट व शोषक असणाऱ्या व्यक्तीला कोणतीही जात अथवा लायकी नसते. याच संदर्भाने एके ठिकाणी खंत व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, मला मी शिकवलेल्या सुशिक्षित बुद्धजीवी वर्गाने धोका दिला, याचा अर्थ असा की, प्रतिकूल परिस्थितीतून ज्यांनी शिक्षण घेतले, ज्यांचे जगण्याचे प्रश्न सुटले त्यांनी आपल्या समाजबांधवांकडे मागे वळून पाहिले नाही. समाजाचे आजचे चित्र अतिशय विदारक स्वरूपाचे आहे. माणूस विज्ञानाच्या प्रगतीमुळे चंद्रावर जाऊ शकला परंतू एकमेकांच्या मनापर्यंत तो पोहचू शकला नाही. तंत्रज्ञानामुळे जेवढा जवळ आला तितकाच तो अंत:करणाने अतिशय दूर गेला.

स्वातंत्र्य, समता, बंधूता, चारित्र्य अशा मूल्यांची रूजवणूक करण्यासाठी कविता हा साहित्यप्रकार अतिशय जवळचा आहे. त्यातून भावनेला हात घातला जातो. समाजजीवनातील अनेक मूल्यांचा वेध घेण्याचे यशस्वी कार्य कवितेने केलेले आहे. माता, माती, मातृभूमी, मातृभाषा व मानवता यांच्याविषयीची कृतज्ञता यातूनच अनेक कवींनी रेखाटली आहे. याच अनुषंगाने शेतकरी व्यवस्था व त्याच्या जीवनाचा शोध घेताना शेतकऱ्यांचे समग्र उद्ध्वस्तले पण कवी संतोष पवार यांनी आपल्या भ्रमिष्टाचा जाहीरनामा व पिढीपंस्तर प्यादेम्यात या दोन काव्य संग्रहातून मांडले आहेत.

वाकळ फाटे वासा बी तुटे घरल दिवा इझंल हाय
इभ्रत सारी लिलाव होती आम्हांला वाली कुणीच नाय

प्रस्तुत कवितेतून ग्रामीण कृषीव्यवस्थेत अडकून पडलेल्या शेतीची व निसर्गाची साथ न मिळणाऱ्या शेतकरी कुटूंबाची अवस्था मार्मीकपणे रेखाटली आहे. अशा कुटूंबातील दिवा नेहमी करीता विझलेलाच दिसतो. त्याच्या समोर आशेचा किरण सध्यातरी कोणत्या मार्गाने दिसत नाही. गतिमान जीवनात कुणीच त्याचा विचार करायला तयार नाही. रावराव राबून सुद्धा योग्य असा मोबदला मिळत नाही. परिणामी दारिद्र्यात भर पडताना दिसते आणि खरे पाहता त्याच्या रोजच्या दैनंदिन गरजा पूर्ण करताना हाता-तोंडाची भेट वेळेला होत नाही. अनंत कष्ट करून सुद्धा हवा तेवढा माल देखील निघत नाही. अशा वेळी दु:खी मनाने तो आपल्या भावना विशद करतो.

कष्टाच चीज आमच्या नाय हाताला जय कधीच नाय
पेरावं ते बी उगत नाय उगतं ते बी पदरी नाय
गिधाड टोळ, आडत्या शेठ चिमणचारा खाऊन जाय
आम्हांला वाली कुणीचं नाय

भारतीय समाजाचा खरा कणा असलेला घटक म्हणजे शेतकरी व शेती व्यवस्था आहे. परंतू आज शेती ही परिस्थितीपुढे अत्यंत तोट्याचा-जुगार असलेला धंदा झाली आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून ते वर्तमानकाळापर्यंत अनेक क्षेत्रात आमूलाग्र असा बदल झाला. परंतू शेतकरी, शेतमजूर यांच्या जीवनात म्हणावे असे परिवर्तन झालेले नाही बहुभूधारक असणारे मात्र लोकसंख्येच्या विस्फोटामध्ये अल्पभूधारक झाले. या झपाट्याने झालेल्या परिवर्तनात पिढ्यान्-पिढ्या पासून चालत आलेले शोषण मात्र कधीही कमी झाले नाही. यामुळे या व्यवस्थेचे कंबरडे मोडले. प्रपंच, संसार चालविण्यासाठी घेतलेले बँकेचे, खाजगी सावकाराचे कर्ज, त्याचा डोंगर हे चित्र पाहून शेवटी शेतकरी आत्महत्या करण्याकडे वळू लागले. या अनुषंगाने इंद्रजित भालेराव आपले विचार एका कवितेत रेखाटतात;

जवा दुष्काळ, दुष्काळ घिरख्या घाली
तवा उरला न उरला व गावांला कुणी वाली
बाप झालाय, झालाय आज भिकारी
गाव असून झालाय आज फिरस्ती
काट्या कुट्याचा तुडवित रस्ता
माझ्या गावाकडं चल माझ्या दोस्ता

कधी कोरडा तर कधी ओला असा दुष्काळ हा शेतकऱ्यांच्या नशिबी पाचवीला पूजल्यासारखा आहेच. यामुळेच प्रसंगी गाव सोडून स्थलांतर करण्याची वेळ त्यांच्यावर येते. एकीकडे तो संपूर्ण जगाचा अन्नदाता-पोशिंदा मात्र त्याच्यावर अशी फिरस्त्या प्रमाणे त्याची अवस्था होताना दिसते. जगण्यातल हे भीषण वास्तव कवितेतून शब्दांकित करतो तो निश्चितच शब्दप्रभू असतो.

शेती व्यवस्था ही पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे आणि निसर्ग हा खरा तर लहरी या अशा परिस्थिती पुढे संकटात सापडतो तोही वेळोवेळी म्हणजे शेतकरी याविषयी चिंतन करताना कवी केशव सखाराम देशमुख आपल्या पाढा कवितेत लिहिताना शेतकऱ्यांच्या सहनशीलतेविषयी नेमक्या शब्दात लिहितात;

खेडी नापास लोक सुन्न
पाऊस गायब, बैल रिकामा
गायी गाभूड, घर भणंग, शेती पडीक

अशा मार्मीक काव्यरचनेतून कृषीजीवनाचा आविष्कार वेळोवेळी अधोरेखित होताना दिसतो. मराठवाड्यातील अनेक लोकप्रिय कवींनी आपल्या लेखणातून शेती-शेतीशी संबंधित विषयावर चिंतन केले आहे. सगळीकडे कशी खिन्नता व नैराश्याच वातावरण आहे.

ज्येष्ठ कवी जगदीश कदम यांनी ग्रामीण भागातील शेतकरी व सावकार यांच्यातील असणारी जाणीव रेखाटली. मागच्या वर्षी नाही, पिकले निदान येणाऱ्या वर्षी तरी पिकेल अशी धारणा लक्षात





Scanned with OKEN Scanner

घेऊन कर्ज घेतले जाते मात्र त्याही वर्षी पिक पाणी व्यवस्थित न झाल्याने जगाचा पोशिंदा संकटात सापडतो त्याचे चिंतन करताना कवी आपल्या कवितेत;

शेतकरी नामशेष असा कसा माझ देश
कुणासाठी सिंहासने शिवतात परिवेश

शेतकरी हा आयुष्यभर राबराब रावतो ऊन-वारा-पाऊस दिवस अन् रात्र अशा सर्वच प्रसंगी तो कष्ट करतो. या विषयी कवी ललित अधाने आपल्या कुणबी बाप कवितेतून;

जीव जाळीत पोळीत बाप राबत राहिला
डोया आसवांचा पूर बाप साहत राहिला

सततच कष्ट अन् त्या कष्टातून दैनंदिन कष्टमय हलाखीचं जीवन असे दयनीय परिस्थितीला सामोरे जाताना आईवडील कुटूंबातील सदस्य, नातेवाईक, मित्रपरिवार अशा सर्वांना खराखुरा आधार देणारा, मदत करताना मागेपुढे न पाहणारा एकमेव असतो तो शेतकरी परंतू आज तो आत्महत्या करताना दिसत आहे. त्यांना धीर देताना कवी ज्ञानेश वाकुडकर आपल्या कवितेत लिहितात;

कर्ज घेऊनि दिवाळी आली
वर यंदाही नापिकी झाली
नवे कपडे घेऊ नका
पाणी पिऊन दिवाळी क:बाबा
जहर खाऊ नका

निसर्गाचे बिघडत चाललेले संतुलन, अपुरी साधनसामुग्री, वाढते लोड-शेडींग, डुप्लीकेट बी-बियाणे, खते, महागडी कीटकनाशके, औद्योगिकीकरणासाठी भरमसाठ होणारा धरणातील पाणी उपसा, दिवसेंदिवस होणारी जमीनीची धूप आणि हाती येणारे कमीत-कमी उत्पन्न. तसेच सावकारीचा पाश, विकास सोसायट्याच घेतलेल अल्पमुदतीच कर्ज, दुष्काळ, गारपीठ यामुळे अशा अनेक कारणांसाठी शेतकरी संकटात सापडून आत्महत्या करू लागला आहे. याच संदर्भात मराठवाड्यातील अनेक ग्रामीण कवीनीं-कवितेतुन दुःख मांडलेले आहे. यात प्रभाकर साळेगावकर, अजय कांडारे, प्रकाश किनगावकर, एकनाथ पाटील, उत्तम कोळगावकर, भारत हंडीवाग, लक्ष्मण महाडिक व चंद्रशेखर मलकमपट्टे आदींनी प्रकर्षाने शब्दबद्ध केले आहे.

कळभूईच्या पोटात
पोटापाठीचा आधार
धर्म कुणब्याचा सांगे
सारा ओसाड शिवार

आज सर्वत्र खाऊजा धोरणाची आंतरराष्ट्रीय स्तरावरून अंमलबजावणी होताना दिसत आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे हीनकस दर्जाचं राजकारण केल जात आहे. शेतकऱ्यांच्या मरणाचं देखील वावगं नाही, जागतिकीकरणाच्या व्यासपीठावरून त्याचे इव्हेंट होतात या बाबतीत कवी उत्तम कांबळे लिहितात;

बळीराजाला कधी कुणी
पावलाखाली गाडलं
कुणी बाजारात मारलं
तर कुणी त्याला
बाजारात पोहचण्यापूर्वीच मारल

काळ्या मातीला माता समजून सेवा करणारा शेतकरी व त्याच्यासोबत कष्टाचं ओझं वाहणाऱ्या शेतकऱ्यांची खरी लक्ष्मी म्हणजे बैलजोडी व गोठ्यातील गुरढोर. शेती-माती व तत्सम असणाऱ्या कृषी संस्कृतीतील घटकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात भाव आपल्या धनी कवितेत भारत हंडीबाग म्हणतात;

मातीसाठी माझा बाप, बैलाबानी राबला
त्याला जगाची चिंता, त्यानं बघितलं आभाळ
बाप मातीत जगला, अन् मातीत इरला (बाप)

भारतीय संस्कृतीची महानता ही कृषी संस्कृतीत दडलेली आहे. अशा या समाजव्यवस्थेचा कास्तकर हा शेतकरी आहे. अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून त्याकडे पाहिले जाते. संपूर्ण देश विकासाकडे वाटचाल करीत असताना दुसरा घटक म्हणजे शेतकरी विकासाच्या लाभात कुठे आहे हा निश्चितच संशोधनाचा विषय आहे. आशा-अपेक्षाच ओझं घेऊन स्वप्न रंगवताना त्यांचे स्वप्न हे हवेतच विरतान दिसते. कवी विठ्ठल वाघ यांच्या शब्दात शेतकऱ्यांच जीवन अधोरेखित करावयाचे तर;

आम्ही जन्मला मातीत
कधी होणार गा माती
खापराच्या दिव्यामधी
कधी पेटणार माती

ग्रामीण साहित्य हे जीवनानुभव, सुक्ष्मनिरीक्षण व संघर्षावर आधारेले आहे. प्राचीन काळापासून पिढ्यानपिढ्या कष्टाच्या माध्यमातून वाट्याला आलेले विषय रेखांकित झाले आहे. प्रत्यक्ष अनुभवविषय समृद्ध असलेले कवी बालाजी इंगळे यांनी शेती व्यवसाय व विज्ञान तंत्रज्ञान यांची एका वेगळ्या पातळीवरून तुलना केलेली आहे. ते लिहितात;

इंटरनेट कनेक्ट करून
करावी कुणाशीही कधीही
मनमुराद चॅटिंग



Scanned with OKEN Scanner

तसं नांगर, कुळव, दावण, कासरा, विहिर, पाचोळा
यापैकी कुणीशीही कनेक्ट
होऊन करावी चॅटिंग तर इथून साऱ्या
तर इथून तिथून साऱ्या
दु:ख भऱ्या कहाण्या....

एकूणच आधुनिक जीवनसंघर्षात अनेक नवीन प्रश्न निर्माण होतात पुन्हा एकदा श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणे आवश्यक आहे. त्यांना जगण्याचे बळ मोठ्या प्रमाणात नवोदित कवींनी व त्यांच्या ठिकाणी असलेल्या सर्जनशीलतेने केलेले आहे ते निश्चितच कौतुकास्पद आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात गृहित धरलेले नियोजन, प्राप्त परिस्थितीमुळे कोलमडते, अशावेळी त्याला आत्महत्या करण्याचे विचार सुचू लागतात मात्र या विषयी मत मांडताना कवी इंद्रजित भालेराव येथे प्रश्न उद्‌गारतात;

पंतप्रधान म्हणाले घेतलेल्या कर्जाच आणि
कुटूंबाच नियोजन करता आले नाही
म्हणून शेतकरी आत्महत्या करतात
शेतकऱ्यांनी विचारलं
देशाचं नियोजन जमलं नाही
म्हणून किती पंतप्रधानांनी
आता पर्यंत आत्महत्या केलेल्या आहेत?

ग्रामीण समाजजीवनाचा आधार म्हणजे शेती व्यवस्था. त्यासोबत शेतकरी, मजूर, बैल बारदाना या सर्वांच अस्तित्व अबाधित असणे अपरिहार्य असते. परंतू याच अनुषंगाने शेती हा जिव्हाळ्याचा व्यवसाय भारत हंडीबाग यांनी अत्यंत समर्पकपणे चित्रित केला आहे. वास्तविक आजच्या दैनंदिन जीवनात आत्महत्या करताना दिसतो. मात्र त्यामागील कारण समजून कुणीही घेत नाही. याचेही चिंतन याद्वारे केले आहे. निसर्गाच्या प्रादूर्भावामुळे होणाऱ्या शेतकऱ्याच्या नुकसानीविषयी कवी लिहितो;

तुरीच्या पाट्याला आले व्हते भारावर भार
धुई फिरली एकदा पुन्हा नाही आले भार
पैसा काढून येजानं केला गव्हाचा पेरा
ओंबी लागताच वर काळ पडला तांबुरा
पेरला हरभरा बघून जमीन काळी
काय नशिबाचा भोग त्याला झाली घाटं आळी

अशाप्रकारे वास्तवाची व्यथा काव्यातून मांडली आहे. कृषीजीवनाचा आधारस्तंभ असणारा शेतकरी, आज चिंताग्रस्त स्थितीत असून त्याच्याविषयीचे चिंतन अनेक कवींनी आपल्या रचनेतून मांडले आहे. साहित्यातून समाजातील संवेदनांचे अविष्कार होत असतात. कवी डॉ. सुभाष कटकधोंड आपल्या रचनेतून व्यक्त करतात;

का शेतकऱ्यांच्या त्या आत्महत्या
नाही खूपत मनाला?
शेतकऱ्यांचा तो आक्रोश का
ऐकू येत नाही कुणाला?
उपयोग नाही झाला
करून पेरणी दुबार
झाला अवकाळी पाऊस
अन् पडल्या गारा
विघडून विस्कटून गेला
हिशोबाचा मेळ सारा
शेतकऱ्यांच्या डोळ्यातील
थांबल्या नाहीत धारा
घर प्रपंचासाठी त्यांच
सर्वस्व लागलं होत पणाला
पण शेतकऱ्यांचा तो आक्रोश
ऐकू येत नाही कुणाला.

**निष्कर्ष :**

स्वातंत्र्यपूर्वकालखंडात ग्रामीण जीवन, निसर्ग, शेती, नातीगोती शिवार शेतकऱ्यांच समृद्ध जीवन असा अवास्तवतेच्या पातळीवर पांढरपेशी शहरी मानसिकतेतून समृद्ध व अधिक रंजकतेने रंगवले गेले होते. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र माणूस स्वार्थी होत गेला. मराठी साहित्य अधिक समाजाभिमुख झाले. त्यामुळे शेतकऱ्यांचे वास्तव जीणं साहित्यातून साकारले गेले. अस्सल ग्रामीण नवतरूणांनी आपल्या स्वअनुभवाची जोड देऊन शेतकरी, शेतमजूरांचे भयान वास्तव, त्यांचे दैनंदिन प्रश्न व सामाजिक समस्या अधिकाधिक पोटतिडकीने मांडू लागले.

**संदर्भ :**

१) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले : साहित्याचा अन्वयार्थ.
२) डॉ. शेषराव नाईकवाडे (संपा.) : जागतिकीकरण समकालीन बदलते संदर्भ.
३) डॉ. जयद्रथ जाधव (संपा.) : १९८० नंतरचे मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या.
४) वसंत आबाजी डहाके : समकालीन मराठी कविता, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.
५) डॉ. तुळशीराम उकिरडे (संपा.) : धनी एक अवलोकन.

□□□



Scanned with OKEN Scanner